सहायक वन सरंक्षक, गट-अ (कनिष्ठ श्रेणी)
संवर्गातील अधिकाऱ्यांची बदली.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन आदेश क्रमांक : एमएफएस-२०१९/प्र.क्र.२७/फ-८.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ मे, २०१९.

<u>शासन आदेश :</u>

महाराष्ट्र वनसेवा, गट-अ (वरीष्ठ श्रेणी) मधील सहायक वनसरंक्षक, गट-अ (कनिष्ठ श्रेणी) या संवर्गातील खाली नमूद अधिकारी यांची शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कामे पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या पदावर बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

अ. क्र.	अधिकाऱ्यांचे नाव व सद्याची पदस्थापना	बदलीने पदस्थापना	शेरा
१	२	३	४
१.	श्री. प्रशांत पोपटराव वरुडे सहायक वनसंरक्षक (रोहयो व कॅम्पा) कन्नड, उप वनसंरक्षक औरंगाबाद वन विभाग	सहायक वनसंरक्षक-२, सामाजिक वनीकरण जालना.	अधिनियम २००५ मधील कलम ४ (५) नुसार सुधारीत पदस्थापना (श्रीमती पवार यांच्या जागी) (प्रशासकीय कारणास्तव)
२.	श्री. गंगाराम मोतीराम शिंदे सहायक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव), जालना, उप वनसंरक्षक औरंगाबाद वन विभाग	उप संचालक-२, संचालक वन प्रशिक्षण संस्था, जालना.	अधिनियम २००५ मधील कलम ४ (५) नुसार सुधारीत पदस्थापना (रिक्त पदावर) (प्रशासकीय कारणास्तव)
३.	श्रीमती पुष्पा परसराम पवार सहायक वनसंरक्षक-२, सामाजिक वनीकरण जालना	सहायक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव), जालना, उप वनसंरक्षक औरंगाबाद वन विभाग	अधिनियम २००५ मधील कलम ४ (५) नुसार सुधारीत पदस्थापना (श्री.शिंदे यांच्या जागी) (प्रशासकीय कारणास्तव)

२. सदर नियुक्ती / पदस्थापना दिलेल्या अधिकाऱ्यांना नियंत्रक अधिकाऱ्यांनी नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यास तात्काळ कार्यमुक्त करावे.

तसेच, संबंधित अधिकाऱ्यांना नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यासाठी कोणत्या दिनांकास कार्यमुक्त केले आणि ते नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले, याबाबत संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी शासनास <u>anil.dhas@nic.in</u> या ई-मेल संकेतस्थळावर त्वरीत कळवावे.

३. संबंधित अधिकाऱ्यांना शासनाच्या पुर्वपरवानगी शिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच म.ना.से. (रजा) नियम १९८१ मधील नियम - ३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्याचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास, ते संबंधित अधिकाऱ्याला मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत. मूळ कार्यालयाकडे बदली झालेल्या अधिकाऱ्याचे रजेचे अर्ज पाठविल्यास सदर अर्जाची दखल घेण्यात येणार नाही.

४. सदरहू बदली आदेशानुसार संबधित अधिकारी तात्काळ नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारे असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचेविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

५. सदर शासन आदेश, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१९०५२८११२२०४५६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Niwrutti Dhas

Digitally signed by Anil Niwrutti Dhas
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=699d21cc89897191099434d443603426329c81b1b292ed2d168c892811118cc7, serialNumber=f85f1c64c05886c8d514e40d54d27ff3a80ffd907a05433b1c412b7f7ffa0afd, cn=Anil Niwrutti Dhas
Date: 2019.05.28 11:29:50 +05'30'

(अनिल धस)
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य,नागपूर.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर.
३) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद
४) वन वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, औरंगाबाद
५) महालेखापाल,महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र-२ नागपूर.
६) जिल्हा कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, जालना
७) मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
८) मा.राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
९) प्रधान सचिव (वने) यांचे स्वीय सहायक
१०) संबंधित अधिकारी (प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), म.रा.नागपूर यांचे मार्फत)
११) वन विभागातील सर्व कार्यासने
१२) निवड नस्ती (फ-८ कार्यासन).